प्रेसनोट दि. ५/०८/२०१७

## VIJAYA FINANCE मधुन लोन देण्याचे अमीष दाखवुन महीलेची आर्थिक फसवणुक करणाऱ्या टोळीस सायबर क्राईम सेल पुणे शहर कडुन दिल्ली येथुन अटक

निगडी येथील महीलेने SULEKHA या वेबसाईट वर लोन साठी रिक्वेस्ट पाठविली असता सदर महीलेस VIJAYA FINANCE यावरुन फोन येवुन लोनसाठी प्रथम २५०० रुपये भरुन रजिस्ट्रेशन करुन घ्यावे लागेल असे सांगितल्याने सदर महिलेने रजिस्ट्रेशन केल्यानंतर आरोपी यांनी वेगवेगळया मोबाईलवरुन सदर महीलेस फोन करुन तुम्हाला १,६०,०००/-रुपये लोन मंजुर झाले आहे. ते मिळवण्यासाठी प्रोसेसिंग फी व इतर वेगवेगळी कारणे सांगुन एकुण ६१,४५०/- रुपये वेगवेगळया अकाऊंटवर रुपये भरण्यास भाग पाडले. परंतु सदर लोनची रक्कम महीलेचे अकाऊंटवर जमा झाली नाही तेव्हा महीलेची एकुण ६३,९५०/- रुपयांची फसवणुक झाली असल्याचे लक्षात आल्याने तिने सायबर क्राईम सेल येथे तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रारी अर्जाचे चौकशीअंती **निगडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ४३१/२०१७ भादंवि. कलम ४१९,४२० माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६सी, ६६डी** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास सायबर क्राईम सेल,गुन्हे शाखा, पुणे शहर यांचे मार्फतीने करण्यात येत होता. सायबर सेलव्दारे तांत्रिक तपास करुन आरोपी हे दिल्ली येथे असल्याबाबत निष्पन्न झाले होते. त्यानुसार सायबर सेलचे पथकाने दिल्ली येथे जावुन सदर आरोपींचा शोध घेवुन आरोपी नामे १) शामकुमार प्रेमकुमार झा वय २५ वर्षे रा. शिवशख मार्ग,मुकुंदपुरी, दिल्ली, २) उषा ऊर्फ खुशी प्रेमलाल गुप्ता ऊर्फ खुशी अगरवाल वय २६ वर्षे रा. आझादपुरी, दिल्ली, ३) दिपचंद्र शर्मन सिंग वय २७ वर्षे रा.नगला मनी, जसराना पट्टी,फिरोजाबाद, यांना शिपमार्केट पितमपुरा, दिल्ली येथे चालु असलेल्या कॉलसेंटर छापा मारुन दि. ३/८/२०१७ रोजी ताब्यात घेवुन त्यांचे व कॉलसेंटरमधुन ०७ मोबाईल, ०९ सिमकार्ड, एक चॉवी, ०८ एटीएम कार्ड, ०३ पॅनकार्ड, चेकबुक मिळुन आल्याने हस्तगत करण्यात आला आहे. त्यांना दाखल गुन्हयात तात्काळ दि. ३/८/२०१७ रोजी १६/३० वा. अटक करुन मा. चिफ मेट्रोपोलिटीयन मॅजिस्ट्रेट, रोहीणी, नवी दिल्ली, यांचेसमक्ष हजर करुन दि. ८/०८/२०१७ रोजीपर्यंत ट्रान्झिट रिमांड कस्टडी मंजुर करण्यात आली आहे.

सदर कारवाई सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधिका फडके, पोलीस निरीक्षक दिपक लगड, सपोनि. सागर पानमंद, पोउनि. विक्रम मिसाळ, पोहवा. अस्लम आत्तार, पो.ना. अजित कुन्हे, पोना. दिपक भोसले, पोशि. राजकुमार जाबा, पो.शि.अमित औचरे, पोलदार,पोशि.बाबासाहेब कराळे, पोशि.अनूप पंडीत,पोशि. संतोष जाधव, मपोशि. अंकिता राघो यांचे पथकाने केली आहे. पुढील तपास निगडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक(गुन्हे) अवताडे हे करित आहेत.

सायबर सेल येथे आरोपी यांचेकडे केले तपासामध्ये या गुन्हयात आरोपींनी वेबसाईटवर लोनसाठी रिक्वेस्ट आलेल्या इसमांची माहीती घेवुन त्यांना फोन करुन लोन मंजुर करण्याकरीता व ते मिळवण्यासाठी वेगवेगळी कारणे सांगुन अकाऊंट नंबर देवुन त्यावर रक्कम भरण्यास भाग पाडुन त्यांची फसवणुक केली आहे.

याद्वारे सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, लोनबाबत इंटरनेटवर अगर फोनवरुन माहीती मिळत असल्यास त्या वेबसाईट व कंपनीची प्रत्यक्षात खात्री करुन लोन ची रक्कम मिळाल्याशिवाय कोणत्याही कारणासाठी पैसे देवु नयेत. VIJAYA FINANCE कडुन तसेच फोन नंबर ०११-६५६७८९१० व १) ९८९९३९५५४०, २) ९६५०४६१२९५, ३) ९८७०५३९८१४, ४) ९७१७९५७५१८, ५) ८५८६०२३००२, ६) ९५६०३६२६८४, ७) ९७१७९५७५६८, ८) ८८००४६३७५६, ९) ७५५०७०१८४२ या नंबरवरुन लोनसाठी **नागरिकांची फसवणुक झाली असल्यास त्यांनी सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर येथे संपर्क करावा.**

सायबर सेल फोन नं. ०२०-२६१२३३४६

ईमेल आयडी- crimecyber.pune@nic.in